**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 6, Nov-Dec – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on :30/10/2020 Accepted on : 15/11/2020 Publication Date: 30/11/2020

# 14 वी विधानसभा निवडणुकीचे अध्ययन

**नासीर कासम शेख**
सहा.प्राध्यापक , राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय
सवना ता.महागांव जि.यवतमाळ (महाराष्ट्र)
Email . : nasir.sheikh313@gmail.com

**सारांश** :- ऑक्टोबर 2019 मध्ये महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली आणि 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा 1957 मध्ये अस्तित्वात असलेली विधानसभा कायम ठेवण्यात आली होती. त्यानंतर 1967, 1978, 1980, 1985, 1990, 1995, 1999, 2004, 2009 आणि 2014 मध्ये विधानसभेच्या निवडणुका घेण्यात आल्या होत्या. इतर निवडणुकांपेक्षा ही निवडणूक वेगळी व महत्त्वपूर्ण निवडणुक ठरली आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या एकूण 288 सदस्यांपैकी 29 सदस्य अनुसूचित जातीचे आणि 25 सदस्य अनुसूचित जमातीचे सदस्य होते. आणि 234 सदस्य हे सर्व प्रवर्गातून निवडण्यासाठी अधिसूचना निवडणूक आयोगाने तयार केली होती. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत 8.33 टक्के महिला विजयी झाल्या आहेत तर 91.66 पुरुष निवडून आलेले आहेत. या निवडणुकीत पूर्वीच्या निवडणुकीपेक्षा महिलांचे प्रमाण सर्वाधिक आहेत.

या निवडणुकीत सर्वाधिक जागा भारतीय जनता पक्षाला मिळाल्या होत्या 124 जागा शिवसेना पक्षाला देण्यात आल्या होत्या आणि 148 जागा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि 121 जागा राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाला निवडणुकीकरीता जागा वाटप करण्यात आलेल्या होत्या. परंतु या निवडणुकीत सर्वाधिक जागा भाजपा-105, शिवसेना-55, राष्ट्रवादी काँग्रेस-54, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-44, आणि मित्र पक्ष व इतर पक्षांनी 29 जागा जिंकल्या होत्या. 24 ऑक्टोबर 2019 रोजी निकाल लागल्यानंतर सत्तेसाठी रंगलेले सत्ता नाट्य अभूतपूर्व ठरले होते. कारण सत्तेसाठी घडलेले नाट्य बघितल्यानंतर हे लक्षात येते की, कोणताही पक्ष सत्ता बनवण्यासाठी कोणत्याही पक्षात जाऊन सत्ता स्थापन करु शकतो हे या निकालावरुन लक्षात येते. म्हणजे सत्ता नाट्य बघितल्यानंतर राजकीय पक्षांवर आणि नेते मंडळीवर असलेला विश्वास एक चीड निर्माण करणारा दिसून येत आहे. अशा प्रकारचे सत्तेसाठी घडलेल्या नाट्य हे लोकशाहीला लाजिरवाणे वाटते. कारण यामुळे या निवडणुकीच्या माध्यमातून महाराष्ट्रासह व इतर देशाच्या राजकारणाला एक वेगळी कलाटणी या निवडणुकीतुन मिळाली आहे.

## १ प्रस्तावना :-

भारताची लोकशाही शासन पध्दती ही सर्वात मोठी संसदीय शासन पध्दती होय. संविधानाच्या अनुच्छेद-1 मध्ये भारताचा उल्लेख राज्यांचा संघ असा असला तरी संघराज्याची सर्व वैशिष्ट्ये निहीत असुन भारतामध्ये दुहेरी शासन व्यवस्था आहे. आज जगातील अनेक देशांमध्ये संसदीय शासन पध्दती दिसत असली तरी देशपरत्वे या व्यवस्थेचे स्वरुप आणि कार्यपध्दतीत फरक आहे.

भारतामध्ये प्रतिनिधीक लोकशाही असल्या कारणाने नागरीक आपले प्रतिनिधी निवडुन देत असतात. दर पाच वर्षांनी सरकार निवडुन देण्याकरीता निवडणुका घेतल्या जातात.

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेची निवडणुक ही ऑक्टोबर 2019 मध्ये 288 जागेकरीता घेण्यात आली होती. 21 ऑक्टोबर 2019 रोजी मतदान घेण्यात आले आणि विधानसभा निकाल हा 24 ऑक्टोबर 2019 रोजी जाहीर करण्यात आला होता. कारण या निवडणुकीत भाजपा 108 जागा जिंकल्या होत्या म्हणुन सर्वात मोठा पक्ष बनला होता. तरी सुध्दा भाजप ला सरकार बनविण्याकरीता अपयश आलेले आहे. कारण या निवडणुकीनंतर महाविकास आघाडी स्थापन झाली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या तीन पक्षांनी मिळुन महाविकास आघाडी तयार केली. आणि सरकार स्थापन करण्यात यश प्राप्त केले. एकंदरीत पाहिले तर असे दिसून येते की निवडणुकी आधी शिवसेना आणि भाजप ची असलेली युती विधानसभेच्या निकालानंतर टिकून राहीली नाही. कारण सत्तेसाठी घडलेल्या घटना आणि मुख्यमंत्री हा भाजपाचा असावा अशी भाजप ची विचार सरणी ही शिवसेना पक्षाला मान्य नव्हती. बरेच दिवसानंतर शिवसेना या पक्षाचा मुख्यमंत्री असावा पण हे भाजपला मान्य नव्हते. त्या कारणामुळे महाविकास आघाडीने शिवसेनाला मुख्यमंत्री पद देवून सरकार स्थापन केले.

## २ संशोधनाची उदिष्टे :-

- महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुक 2019 चे अध्ययन करणे.
- विधानसभा निवडणुक निकालानंतर घडलेल्या राजकीय घडामोडीचे अध्ययन करणे.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 6, Nov-Dec – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on :30/10/2020 Accepted on : 15/11/2020 Publication Date: 30/11/2020

३ **संशोधनाची गृहितके** :-

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुक 2019 अनेक कारणामुळे महत्वपुर्ण ठरली.
- निवडणुक निकालानंतर घडलेल्या घटना आणि घडलेल्या घडामोडी त्यामुळे राज्यासह देशाच्या राजकारणाला वेगळे वळण मिळाले.

४ **अध्ययन पध्दती** :-

प्रस्तुत संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील विश्लेषणात्मक, तुलनात्मक, वर्णनात्मक, आणि सर्वेक्षणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलनाकरीता प्राथमिक आणि व्दितीय साधन चा वापर करुन प्रस्तुत संशोधन करण्यात आले आहे.

५ **महाराष्ट्र विधानसभा निवडणुक-2019** :-

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेची निवडणुक एकुण 288 जागेकरीता पार पडली. 27 सप्टेंबर 2019 रोजी निवडणुक आयोगाने अध्यादेश काढुन 4 ऑक्टोबर 2019 पर्यंत नामांकन दाखल करणे, 5 ऑक्टोबर 2019 ला अर्जाची छाननी करणे 7 ऑक्टोबर 2019 ला अर्ज परत घेणे आणि 21 ऑक्टोबर 2019 मतदान आणि 24 ऑक्टोबर 2019 रोजी मतदान निकाल जाहीर करणे.

यापुर्वी महाराष्ट्र राज्यामध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या होत्या. मात्र ही निवडणुक अनेक अर्थाने वैशिष्ट्यपुर्ण ठरली आहे. या निवडणुकी अगोदर खुप मोठ्या प्रमाणात पक्षांतर झालेले आहे. ही पक्षांतरे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस कडुन भाजप व शिवसेनेकडे झालेली आहे. म्हणजेच कोण कधी पक्षांतर करेल याचा काही नेम नव्हता. एकंदरीत रित्या भाजप मध्ये मोठी भरती झाली होती. त्यामुळे सर्व सामान्यांनी राजकीय नेत्यांच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते आणि याची प्रचिती निवडणुका झाल्यानंतर म्हणजेच निवडणुक निकालानंतर दिसुन आली.

**निवडणुक प्रचार** :-

महाराष्ट्र विधानसभा निवडणुक प्रचारात सर्वच राजकीय पक्ष आणि अपक्ष पक्षांनी जोर लावला होता. सर्वात् जास्त प्रचार सभा ह्या भाजपाने घेतल्या होत्या. यामध्ये पंतप्रधान, गृहमंत्री अनेक मंत्री व केंद्रीय मंत्री महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस आणि इतर मंत्री यांनी प्रचार सभा घेतल्या होत्या. या प्रचारामध्ये 370 वे कलम, राममंदीर, राष्ट्रवाद, तीन तलाख मुद्दा यासह विकासाचे मुद्दे धरुन प्रचार करण्यात आला आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस **"मी पुन्हा येईन------------"** ही घोषणा चर्चात्मक ठरली.

शिवसेना या पक्षाचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी प्रचार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या प्रचाराचा मुख्य मुद्दा हिच ती वेळ आणि **"मुख्यमंत्री हा केवळ शिवसेनेचाच होईल"** ही घोषणा लक्षवेधी ठरली. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अध्यक्ष मा.शरद पवार यांनी प्रचाराची सर्व सुत्रे स्वताकडे घेतली परंतु जास्तीत जास्त प्रमुख नेते पक्ष सोडुन गेले तरी आपण पक्षाला नवी उभारी देवू शकतो असा आत्मविश्वास कार्यकर्त्यामध्ये निर्माण केला.

प्रचारामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस खुप पिछाडीवर राहीली. राहूल गांधीच्या एक दोन जागी प्रचार सभा दिसुन आल्या. त्यानंतर काँग्रेसच्या प्रचारसभा दिसुन आल्या नाहीत आणि भारतीय काँग्रेसच्या नेत्यांमध्ये असलेला आत्मविश्वास या निवडणुकीमध्ये दिसून आला नाही. तसेच इतर अपक्ष व मित्रपक्ष यांनी आपापल्या परीने प्रचार केला. आज निवडणुकीची खरी लढत ही भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस या दोनच पक्षामध्ये दिसुन येते.

**महाराष्ट्र विधानसभा निकाल** :-

महाराष्ट्र विधानसभा निवडणुक निकाल दिनांक 24 ऑक्टोबर 2019 रोजी मतमोजणी नंतर जाहीर करण्यात आला. काही मतदार संघाचा निकाल दुपार पर्यंत लागले तर काही मतदार संघाचा निकाल रात्री उशिरापर्यंत जाहीर करण्यात आला होता.

**महाराष्ट्र विधानसभा निकाल** :-

| राजकीय पक्ष | जागा | | मतदान | | मतदान टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | +/- | संख्या | टक्के | +/- |
| भाजप | 105 | 36.44 | -17 | 14199948 | 25.75 | -2.20 |
| शिवसेना | 56 | 19.14 | -7 | 9049789 | 16.41 | -9.67 |
| भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | 44 | 15.28 | +2 | 8752109 | 15.87 | -2.17 |
| राष्ट्रवादी काँग्रेस | 54 | 18.75 | +13 | 9216911 | 16.71 | -0.62 |
| सीपाआय | 00 | 00 | 00 | 35188 | 00.1 | +0.01 |
| सीपीआय (एम) | 1 | 0.35 | - | 204933 | 0.37 | -0.03 |
| एमएनएस | 1 | 0.35 | - | 1242135 | 2.25 | -0.91 |
| एमआयएमआय एम | 2 | 0.69 | - | 737888 | 1.34 | +0.41 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बसपा | 00 | 00 | - | 504911 | 0.92 | -1.34 |
| सपा | 2 | 0.69 | +1 | 123269 | 0.22 | +0.05 |
| बहुजन वंचित आघाडी | 22 | 00 | - | 2523583 | 4.58 | +4.58 |
| इतर | 23 | 7.99 | 8 | 7816887 | 14.17 | +3.86 |
| नोटा | - | - | - | 742134 | 1.35 | +0.35 |

**संदर्भ - भारतीय निवडणुक आयोग सारणी.**

उपरोक्त सारणीचे अध्ययन केले असता असे निदर्शनास येते की, सर्वाधिक जागा भाजपा-105 जिंकल्या आहेत, शिवसेना या पक्षाने 56 जागा जिंकल्या आहेत. तर भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने 44 जागा जिंकल्या आहेत आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस या पक्षाने 54 जागा जिंकल्या आहेत इतर व अपक्ष पक्ष मिळुन 29 जागा जिंकल्या आहेत.

## ६ <u>निष्कर्ष</u> :-

महाराष्ट्र राज्याची 14 वी विधासनसभा निवडणूक 2019 या संशोधनावरुन असे अनेक निष्कर्ष काढता येईल महाराष्ट्रामध्ये यापुर्वी अनेक निवडणुका झालेल्या आहेत. परंतु ही 14 वी विधानसभेची निवडणुक अनेक अर्थाने वेगळी ठरली आहे. निवडणुकी पुर्वी पक्षांतराला वाव मिळाला होता. पक्षांतरामुळे अनेक नेत्यांनी भाजपामध्ये प्रवेश मिळविला आणि निवडणुका लढल्या होत्या. म्हणजेच इतके वर्षापर्यंत वेगवेगळी पदे व मंत्रीपद मिळणारी व्यक्ती सुध्दा पक्षांतर करु लागली ही एक अनाकलनीय बाब ठरली होती. त्यामुळे त्यांच्या निष्ठांवर आणि विचारसरणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यात यावा होता. परंतु तसे झाले नाही. त्यावरुन पक्षांची महिलांच्या आरक्षणा विषयीची भूमिका लक्षात येते. म्हणजेच निवडणुकीत पुरुषांचीच मक्तेदारी दिसुन आली . निवडणुकीमध्ये राजकीय पक्षांच्या मतांची टक्केवारी घसरलेली असुन नोटाला मत देणाऱ्यांची पसंती दिवसेंदिवस वाढत जात आहे. निश्चितच राजकीय पक्ष आणि लोकशाही साठी ही गंभीर बाब आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीत अनेंक प्रकारचे दोष दिसुन येत असले तरी जोपर्यंत मतदार जागृत होत नाही तोपर्यंत हे चित्र बदलणार नाही हे मात्र निश्चितच होय.

## <u>संदर्भ ग्रंथ सुची</u> :-

१ पवार प्रकाश-महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्र् रचना-पुणे प्रतिभा प्रकाशन 2009.
२ लांडगे प्रा.पंडीत शिवराय-भारतीय शासन आणि राजकारण-अरुणा प्रकाशन लातुर-2014.
३ लोटे रा.ज.-राजकारणातील आधुनिक संकल्पना आणि धोरण-पिंपळापूरे प्रकाशन, नागपुर 2019.
४ पळशीकर सुहास-जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण-सुगावा प्रकाशन 2003.
५ कर्डेकर अनिल-महाराष्ट्र विधानसभा निवडणुक आणि निकाल-विद्या प्रकाशन, नागपुर 2019.
६ गिरले-विधानसभा परीक्षा आणि कामकाज-विद्या प्रकाशन, पुणे 2019.